**ठळक बातम्या**

- राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस पदभरती प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे सरकारचे आदेश

- मराठीचा अभिमान असावा मात्र त्यासाठी कायदा हातात न घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच योग्य जागा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

**आणि**

- सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कोठडीतल्या मृत्यूप्रकरणी पोलिसांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

**<><><><><>**

राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बोगस पदभरती प्रकरणी, संबंधित विभाग आणि शिक्षणसंस्थांच्या अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करायचे आदेश दिले असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहाला दिली. आमदार सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. या प्रकरणी एका महिन्याच्या आत राज्यस्तरीय चौकशी समिती स्थापन केली जाणार असल्याचंही भोयर यांनी सभागृहाला सांगितलं. राज्य सरकारच्या १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार ठरवलेल्या,शाळांच्या संच मान्यतेच्या निकषात सुधारणा केली जाणार आहे, तसंच शालार्थ ओळखपत्र तातडीनं देण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे, असंही त्यांनी एका तारांकित

प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. शासन निर्णयासंबंधी विरोधी पक्षाच्या सूचना विचारात घेण्याकरता एका बैठकीचं आयोजन करणार असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली. आमदार अभिजीत वंजारी यांनी याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><><>

राज्यातल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अपुरा हमीभाव, अपूरी नुकसान भरपाई आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीतलं दुर्लक्ष यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, असा आरोप विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला.

राज्य सरकारने शेतकऱ्यांना सौर पंप देण्याची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात ३ लाख ३१ हजार अर्ज सरकारकडे पडून आहेत, असा आरोप दानवे यांनी आज नियम २६० अन्वये मांडलेल्या ठरावादरम्यान केला. राज्यातल्या एकूण २ लाख ६६ हजार शेतकऱ्यांनी सौर पंपासाठीचा त्यांचा हिस्सा सुद्धा भरलेला आहे. याद्वारे, सरकारकडे ९४४ कोटी रुपये इतकी रक्कम जमा असूनही त्यांना सौर पंप मिळायला आणखी बराच अवधी लागणार आहे, असंही दानवे यावेळी म्हणाले.

या वेळी आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी आदी आमदारांनी, ठरावावरील चर्चेत सरकारच्या बाजूने मत मांडले. तर आमदार अभिजीत वंजारी, भाई जगताप यांनी ठरावाच्या विरोधात मत मांडले.

<><><><><>

राज्यातल्या मालमत्ता खरेदी विक्रीच्या नोंदणीनंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या हिश्शाचा एक टक्का रक्कम त्वरित देण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार केली जाईल, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात दिली. या विषयावर अर्थमंत्री आणि

मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. रणधीर सावरकर यांनी ही लक्षवेधी मांडली होती.

सध्या राज्यातल्या नगरपालिकांचे ९३० कोटी, महानगरपालिकांचे ४ हजार ३२९ कोटी, तर जिल्हा परिषदांचे २ हजार ५९८ कोटी इतकी रक्कम देणं बाकी असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

धाराशीव जिल्ह्यात पवनचक्की कंपन्या स्थानिक गुंड आणि पोलीस अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याबद्दलच्या सर्व तक्रारींची पोलिस महानिरीक्षकाकडून उच्चस्तरीय चौकशी करायची घोषणा गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली. पवनचक्कीप्रकरणी प्राप्त झालेल्या ३१३ तक्रारींपैकी २१० तक्रारी निकाली निघाल्या आहेत, तर १०३ तक्रारींवर कार्यवाही सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबई शहराच्या अंधेरी उपनगरातल्या ईएसआयसी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या नूतनीकरणाचं काम येत्या डिसेंबरच्या अखेरपर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत दिली. या हॉस्पिटलमध्ये केवळ ईएसआयसीच नव्हे तर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत देण्यात येत असलेल्या वैद्यकीय सुविधांचा समावेश करण्यात येणार असल्याचंही आबिटकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मराठीचा अभिमान बाळगणं हे अजिबात चुकीचं नाही. पण, भाषेच्या मुद्द्यावरून कुणालाही मारहाण करणं चुकीचं आहे. अशा प्रकारच्या कृत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री (१३ सेकंद)**

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण केलं. थोरले बाजीराव पेशवे यांच्या स्मारकाची योग्य जागा ही राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच आहे. याच ठिकाणी तिन्ही सैन्यदलांचे अधिकारी भविष्याचं प्रशिक्षण घेतात. ते बाजीराव यांच्याकडून प्रेरणा घेतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**- होल्ड - अमित शहा बाइट -**

*(युद्धाचे काही नियम कधीच कालबाह्य होत नाहीत. युद्धात देशभक्ती, समर्पण, बलिदान हि भावना असते. बाजीराव पेशवे या अजिंक्य योद्धयाने २० वर्षात ४१ युद्ध जिंकली. अनेक हरलेली युद्ध त्यांनी विजयात परिवर्तित केली. इतिहास बदलण्याचा प्रयत्न केला गेला परंतु इतिहासातील या योद्ध्यांची माहिती नव्या पिढी पर्यंत पोहोचवणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमानंतर शाह यांनी एनडीए च्या छात्रांशी संवाद साधला. यानंतर अमित शहा यांनी एक क्रीडा केंद्राचं उद्घाटन केलं आणि आरोग्य केंद्राचं भूमीपूजन केलं.)*

**<><><><><>**

परभणीतले कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीतल्या मृत्यूप्रकरणी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात आठ दिवसांच्या आत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानं आज हे आदेश दिले. त्यांच्या आई विजयाताई सूर्यवंशी यांनी याबद्दलची याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती.

राज्य सरकार आणि पोलिसांनी सुर्यवंशी यांचा मृत्यू हृदयविकारानं झाल्याचा दाखवण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयानं हा दावा फेटाळला, तसंच सुर्यवंशी यांच्या आईनी दाखल केलेल्या अर्जाच्या आधारेच गुन्हा दाखल करावा, असे निर्देश न्यायालयानं दिले असल्याची माहिती याप्रकरणातले वकील आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.

<><><><><>

शालेय अभ्यासक्रमात हिंदी सक्तीच्या शासन निर्णया विरोधात जाहीर केलेला मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांचा विजयी मेळावा उद्या सकाळी होणार आहे. मुंबईत वरळी NSCI डोम इथं या मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

कॉमन युनिव्हर्सिटी एंट्रन्स टेस्ट-CUET २०२५ चा निकाल राष्ट्रीय चाचणी एजन्सीनं आज जाहीर केला. या परीक्षेत एका विद्यार्थ्यानं चार विषयांमध्ये १०० पर्सेंटाईल गुण मिळवले आहेत.

देशातली विविध केंद्रीय विद्यापीठं आणि सहभागी संस्थांमधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशांसाठी ही परीक्षा घेतली जाते. १३ मे आणि ४ जून अशा दोन टप्प्यांमध्ये झालेल्या परीक्षेसाठी १३ लाख ५४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल cuet.nta.nic.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील.

<><><><><>

पिढ्यानपिढ्या जल, जमीन तसंच जंगलाचं रक्षण करत पर्यावरणाचं संतुलन राखण्यात मोठं योगदान देणाऱ्या आणि केवळ वनजमिनीवर उपजीविका अवलंबून असणाऱ्या आदिवासी बांधवांच्या विकासासाठीच वनहक्क कायद्याची अंमलबजावणी केली जात असल्याचं प्रतिपादन राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष आंतररसिंह आर्या यांनी आज नंदुरबार इथं केलं. ते जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित वनाधिकार पट्टा वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

<><><><><>

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेली संत एकनाथ महाराज यांची पालखी आज सायंकाळी होळे मुक्कामी दाखल होईल. उद्या सकाळी पालखी कवठाळीकडे मार्गस्थ होईल. शिराढोण इथं उभं रिंगण पार पडल्यानंतर सायंकाळपर्यंत पालखी पंढरपुरात दाखल होईल. येत्या गुरुपौर्णिमेपर्यंत पालखी पंढरपुरात मुक्कामी राहणार असून, चतुर्दशीला विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भानुदास महाराजांचा पुण्यतिथी सोहळा साजरा होणार आहे.

**<><><><><>**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं नांदेड शहरात आज शाळकरी विद्यार्थी आणि बालकांची निर्भया वारी काढण्यात आली होती. या वारीत शहरातल्या विविध शाळा, एन सी सी तसंच श्री विमलेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे सुमारे दीड हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

गेल्या २४ तासांत मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या २४ तासांत मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

रत्नागिरीत आज सकाळपासून पावसाचं प्रमाण तसं कमी होतं; मात्र दुपारनंतर पावसाचा जोर वाढला आहे. हवामान विभागाने जिल्ह्याला सात जुलैपर्यंत पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. दरम्यान, आगामी दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. पश्चिम बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या चक्रीवादळामुळे समुद्रात मोठ्या लाटा उसळण्याची तसंच किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. आगामी दोन दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रातल्या घाट परिसरात अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**